# Section – 4

## आवश्यक कागदपत्रांचा तपशिल

अ) संकेत स्थळावर अपलोड करावयाच्या आवश्यक कागदपत्रांचा तपशिल

1) सोबत दिलेल्या पृष्ट क्रमांक 11 वरील ANEXTURE -1 प्रमाणे लिलावाची माहिती
2) सोबत दिलेल्या पृष्ट क्रमांक 12 वरील ANEXTURE -2प्रमाणे स्व-घोषणापत्र
3) पॅनकार्डची छायांकित प्रत (फर्म/मालक/लिलावदार)
4) फर्मचे GST नोंदणी प्रमाणपत्र छायांकित प्रत
5) फर्म नोंदणी प्रमाणपत्र छायांकित प्रत
6) बयाना रक्कम धनाकर्ष
7) लिलाव शुल्क धनाकर्ष

उपरोक्त सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती दिनांकासह साक्षांकित करुन www.eauction.gov.inया संकेतस्थळावरअपलोड करावे

ब) कार्यालयात येऊन सादर करावयाच्या कागदपत्रांचा तपशिल

पृष्ट क्रमांक 2ते 5 वरील Section -2 मध्ये नमुद केल्याप्रमाणे १) लॉटचे लिलाव शुल्क २) लॉटची बयाना रक्कम राष्ट्रीयकृत बँकेच्या वेगवेगळया धनाकर्ष (DD) स्वरुपात**(लिलाव शुल्क/ बयाना रक्कम)**

(Accounts Officer to Dy.Director,Vocational Education & Training Regional Office, Nashik-2)

यांच्या नावे काढावा

उपरोक्त लॉटचे लिलाव शुल्क व लॉटची बयाना रकमेचा मुळ धनाकर्ष वेगवेगळे (त्याच्या पाठीमागील बाजुस लॉट क्रमांक व फर्मचे /लिलावदाराचे नांव / भ्रमणध्वनी क्रमांक (मोबाईल नंबर)नमुद करणे आवश्यक आहे) सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नाशिक, जूना आग्रारोड, त्रिंबक नाका, आदिवासी विकास भवन जवळ नाशिक 422002 येथे कार्यालयात दिनांक 13/01/2023 वेळ सायं. 5.00 वाजेपर्यंत सादर करावेत,जे लिलावदार विहीत मुदतीत लिलाव शुल्क व बयाना रकमेचे मुळ धनाकर्ष सादर करणार नाहीत, अशा लिलावदारांचा ई-लिलाव प्रक्रियेत समावेश केला जाणार नाही.

# Section -5

## ई-लिलावाच्या अटी व शर्ती

1. सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नाशिक यांच्या अधिपत्याखालील नाशिक विभागातील औद्योगिक प्रशिक्षण संस्था,तसेच शासकिय तांत्रिक विद्यालय येथील विक्री करावयाच्या साहित्याची विक्रीची प्रक्रिया ई-लिलाव पध्दतीने www.eauction.gov.inया संकेतस्थळावर करण्यात येईल. याबाबतची सर्व माहिती,पुढील सर्व सूचना व शुध्दीपत्रके www.eauction.gov.inया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.
2. सदरील साहित्याची जेथे आहे तेथे (विविध संस्थांमधील यंत्रसामुग्री) व जसे आहे तसे या तत्वावर विक्री करावयाची आहे. लिलावधारक सदरील साहित्याची पाहणी कार्यालयीन कामकाजाची दिवशी सकाळी 10.00 ते सायंकाळी 5.00 वाजेपर्यंत संबधित संस्था/केंद्रामध्ये जावून प्रत्यक्ष करु शकतात.
3. सहसंचालक,व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय,नाशिक यांच्या कार्यालयात लिलावाच्या कार्यवाहीसाठी समिती नेमलेली आहे. सदर समितीने घेतलेला निर्णय अंतिम असेल.
4. www.eauction.gov.inया संकेतस्थळावर Section -4 प्रमाणे आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.
5. ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेणे करिता लिलावदाराकडे स्वत:ची Digital Signature Certificate तसेच त्यांनी विहीत पोर्टलवर नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे.
6. लिलावधारकांनी विहीत पध्दतीत बिड संकेतस्थळावर सादर करणे बंधनकारक आहे.संबधित लिलावधारक तसे न करु शकल्यास बोली प्रक्रियेतुन आपोआप बाद होईल.
7. लिलावाच्या वेळापत्रकात आणि अटी व शर्तीत बदल झाल्यास तो बदल संकेतस्थळावर अपलोड करण्यात येईल.लिलावधारकाच्या निष्काळजीपणामुळे जर लिलाव प्रक्रियेत झालेला बदल संबधित लिलावधारकास न कळल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही.
8. आवश्यक कागदपत्रांचे Online मुल्यमापन केल्यानंतर केवळ पात्र लिलावधारकांना या प्रक्रियेत भाग घेण्याची परवानगी देण्यात येईल.
9. स्वत:च्या अटी टाकून सादर केलेले लिलावपत्रक मान्य करण्यात येणार नाही. असे केल्यास संबधित लिलावधारकास बोली प्रक्रियेतुन अपात्र ठरवण्यात येईल.
10. लिलावधारकांनी लॉटनुसार बोली सादर करावी. ज्या लिलावधारकाची बोलीची रक्कम लॉटनिहाय या कार्यालयाच्या समितीने निर्धारित केलेल्या हातच्या किंमतीपेक्षा (Upset Price) जास्तीत जास्त असेल त्या लिलावधारकास सदर लॉटमधील संपुर्ण साहित्याची विक्री करण्यात येईल.
11. सर्व लिलाव धारकांना समान संधी मिळण्याकरीता लिलावाची बोली सादर करण्याची अंतिम वेळ संपण्यापूर्वी १० मिनीट अगोदर एखादी लिलाव बोली प्राप्त झाल्यास लिलावाची अंतिम वेळ अपोआप १० मिनीट पुढे जाईल. ई-लिलाव विहीत कालावधीत व अंतिम बोली नंतर पुढील १० मिनीटात जे यापैकी उशिरा घडेल त्यावेळेस लिलावाची बोली संपुष्टात येईल. ( e –Auction Software नुसार)
12. लिलाव शुल्क व बयाना रकमेत कोणत्याही स्वरुपाची सुट लागु नाही. लिलाव शुल्क व बयाणा रक्कम न भरता ई-लिलाव प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. लिलाव शुल्क व बयाणा भरणे बंधनकारक आहे.